**समरी केस क्र. ४७१/२०१७**

## निशाणी १ वरील आदेश

फिर्यादीने आरोपीविरुध्द दाखल केलेली फिर्याद, फिर्यादीचे सत्यकथन, फिर्यादी सोबतचे कागदपत्र वाचले. फिर्यादीचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. फिर्यादीमधील कथनांवरुन असे दिसून येते की, आरोपीने तारीख ३०/०५/२०१७ रोजीचा ओरिएंटल बॅक ऑफ कॉमर्स, शाखा— मंचरचा रक्कम रुपये ४०,३६०/— एवढया रक्कमेचा धनादेश क्र.००४३१८ हा फिर्यादीकडील त्याची कायदेशीर जबाबदारी पूर्ण करण्यासाठी फिर्यादीच्या नावे दिला व सदर धनादेश तारीख २९/०६/२०१७ रोजी “Funds Insufficient” या कारणास्तव न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने पाठविलेली तारीख १५/०७/२०१७ रोजीची नोटीस दि.१७/०७/२०१७ रोजी आरोपीला मिळून सुध्दा १५ दिवसांच्या आत आरोपीने सदर धनादेशाची रक्कम फिर्यादीला देण्यात कसूर केला. यावरुन आरोपीविरुध्द परक्राम्य संलेख कायदा कलम १३८ प्रमाणेच्या अपराधाच्या चौकशीसाठीची कारणे दिसून येतात. यावरुन पुढील आदेश पारित केला आहे.

## आ दे श

१) आरोपीविरुध्द पराक्राम्य संलेख कायदा कलम १३८ प्रमाणेच्या गुन्हयाच्या अपराधासाठीची आदेशिका जारी करण्यात यावी.

२) फिर्यादीने आदेशिका शुल्क भरावे.

३) आरोपीला समन्स काढावे.

४) आदेशिका जारी करताना आदेशिकेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दामोदर एस. प्रभू विरुध्द सय्यद बाबालाल एच. [2010 AIR (SC) 1907] या प्रकरणातील न्यायनिर्णयामध्ये परिच्छेद क्र. १५ मध्ये नमूद मार्गदर्शक तत्वांनुसार पुढील निर्देश दयावेत.

अ) आरोपीने सदर प्रकरणामध्ये हजर झाल्यानंतर पहिल्या अथवा दुसऱ्या तारखेला गुन्हा तडजोडीने मिटवण्यासाठी अर्ज केल्यास व त्याप्रमाणे तडजोड मान्य होताना आरोपीवर कोणताही खर्च लादला जाणार नाही.

ब) आरोपीने सदर प्रकरणात दुसऱ्या तारखेनंतर पुढे कोणत्याही टप्प्यावर गुन्हा तडजोडीने मान्य होताना आरोपीवर फिर्यादी मध्ये नमूद धनादेशाच्या रक्कमेच्या १० टक्के इतकी रक्कम मा. जिल्हा विधी सहाय्यता प्राधिकरण, पुणे यांच्याकडे जमा करण्यासाठी या न्यायालयात भरण्याची अट लादण्यात येईल व गुन्हा तडजोडीने या अटींची पूर्तता केल्यानंतरच मिटेल.

क) आरोपीला पुढे असेही सूचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने वर नमूद प्रकरणात दिलेल्या निर्देशाप्रमाणे गुन्हा तडजोडीने मिटविण्यासाठी सदर प्रकरणात पुढे मा. उच्च न्यायालय अथवा मा. सत्र न्यायालयात दाखल अपील अथवा रिव्हीजन मध्ये अर्ज केल्यास गुन्हा तडजोडीने मिटल्यास या प्रकरणातील धनादेशाच्या रक्कमेच्या १५ टक्के रक्कम खर्च म्हणून देण्याच्या अटीवर मान्य होऊ शकते.

ड) तसेच आरोपीने सदर प्रकरणा संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयापुढे दाखल झालेल्या कार्यावाहीत असा अर्ज केल्यास धनादेशाच्या रक्कमेच्या २० टक्क्यांपर्यंत खर्चाच्या रक्कमेत वाढ होऊ शकते.

तारीख १४/०२/२०१८ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जुन्नर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | R.G. Bagade,<br>C.J.J. D. & J. M. F. C. Junnar, Dist. Pune. |
| Name of the Stenographer | : | Anil Kashinath Mate |
| Date of decision | : | 14-02-2018 |
| Signed by P. O. on | : | 14-02-2018 |
| Upload on | : | 14-02-2018 |